# प्रेस नोट ता. ३१/०७/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

## मोटार सायकल चोरी करणारे ०४ चोरटयांना अटक

## एकुण १० गुन्हे उघड करुन ५,००,०००/- रु किं च्या १० मोटार सायकली जप्त.

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- oo ---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात मोटार सायकल चोरी मध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना जास्तीत जास्त पोलीस अंमलदार नेमुन सतर्क पेट्रोलींग, सक्त नाकाबंदी, वाहन चोरी करणारे आरोपींची माहीती काढुन आरोपी अटक करुन वाहन चोरींना आळा घालणेबाबत आदेश दिले आहेत.

मा.श्री. गणेश जवादवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांना सोबतचे पोलीस अंमलदार यांचा वापर करुन वाहन चोरीचे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करणे, वारंवार वाहन चोरीचे ठिकाणी सापळा रचने तसेच महत्वाचे येण्या जाण्याचे मार्गावर अचानक नाकाबंदी करुन वाहने चेक करुन मोटार सायकल चोरींना आळा घालने तसेच दाखल गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन आरोपींना अटक करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मोटार सायकल चोरांची माहिती प्राप्त करण्यासाठी तांत्रिक तपास व पांरपारिक गोपनिय बातमीद्वारे माहिती प्राप्त करून तपास सुरू केला. त्याकरिता दिवसा व रात्री अचानक नाकाबंदी कारवाई करुन मोटार सायकली तपासणी केली. दरम्यान सपोनि.संतोष पाटील हे त्यांचे सोबतचे पथकासह पेट्रोलींग करीत असताना माहीती मिळाली की, चोरीची मोटार सायकली विक्री करीता चार चोरटे थेरगाव परिसरात येणार आहेत. अशी बातमी मिळालेने त्यांनी स्टाफसह प्राप्त माहिती अनुषंगाने थेरगाव जावुन सापळा कारवाई करुन थांबले. काही वेळात सदर ठिकाणी प्राप्त माहितीचे वर्णनाचे चार इसम दोन मोटार सायकलीवरुन तेथे आले. पोलीसांची चाहुल लागताच आरोपीं सदर ठिकाणांवरुन पळुन जाण्याचा प्रयत्न करित असतांना सपोनि.संतोष पाटील यांनी सोबतच्या स्टाफसह पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपली नावे **१) कमलेश भागवत परदेशी वय २२ वर्षे रा. चिंतामणी चौक, बिजली नगर हरीओम कॉलनी नं.०२, चिंचवड पुणे मुळ रा. मुपो.लोंढे ता.चाळीसगाव जि.जळगाव २) शुभम राजेंद्र निकम वय २० वर्षे रा. वाल्हेरकरवाडी, पेट्रोल पंपाचे जवळ, गुरुद्वारारोड चिंचवड पुणे मुळ रा. मुपो.लोंढे ता.चाळीसगाव जि.जळगाव ३) पुष्पक दिलीप पाटील वय २३ वर्षे रा.आनंदवन सोसायटी, थेरगाव पुणे मुळ रा. मुपो.लोंढे ता.चाळीसगाव जि.जळगाव ४) प्रज्वल लालजी भोसले वय २४ वर्षे रा. वाल्हेरकरवाडी, पेट्रोल पंपाचे जवळ, गुरुद्वारारोड चिंचवड पुणे मुळ रा. मुपो.लोंढे ता.चाळीसगाव जि.जळगाव** असे सांगितले. त्यांचे ताब्यातील होंडा शाईन व होंडा सिबी शाईन मोटार सायकलींबाबत त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी सदरच्या मोटार सायकली वाकड व चिखली परीसरातुन चोरलेचे सांगीतलेने सदरचे दोन मोटार सायकली जप्त करणेत आल्या. सदरचे आरोपी अटक करुन आरोपींकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्यांनी पिंपरी चिंचवड परीसरातील मोटार सायकल चोरीचे एकुण १० गुन्हयांची कबुली देवुन किं.रु. ५,००,०००/- रुपये किंमतीच्या १० मोटार सायकली त्यांचेकडुन जप्त करणेत आल्या असुन अधिक तपास करीत आहोत.आरोपींची दि.०२/०७/२०२३ पोलीस कोठडी प्राप्त आहे.

**आरोपींकडुन खालील गुन्हे उघड करणेत आले आहेत.**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ७२१/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| २ | चिखली | ४७५/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९प्रमाणे |
| ३ | वाकड | ६४९/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | वाकड | ७१४/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | वाकड | ३९९/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ६ | वाकड | ७४१/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ७ | येरवडा पुणे शहर | ४८६/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ८ | पिंपरी | ७९७/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ९ | पिंपरी | ८११/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १० | चिंचवड | ३५५/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |

**वाकड तपास पथकाने चालु वर्षात आज पावेतो मोटार सायकलचे ९० उघड करुन एकुण ४५,००,०००/- रु किंमतीच्या ९० मो.सा.जप्त करुन आरोपी अटक केले आहेत.**

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२ पिंपरी चिंचवड, मा. श्री.डॉ. विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**आवाहन :- सर्व नागरीकांना आवाहन करणेत येते की वाहन चोरीच्या गुन्हयांमध्ये वाढ होत असुन आपण आपले वाहन सुरक्षीत ठिकाणी पार्क करावेत. पार्कीग व्यवस्था नसल्यास सदर वाहनास चैनच्या साहाय्याने अथवा दुसरे लॉक लावावे जेणेकरुन आपले वाहन सुरक्षीत राहील. तसेच जिपीएस सिस्टीम बसवुन घ्यावेत.तसेच आपली वाहने कंपनीचे बाहेर, सोसायटीच्या बाहेर, मॉलच्या व दुकानाच्या बाहेर रोडवर पार्क करुन ठेवु नयेत. याची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.**

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड